REGISTERED No. B 3434

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १३ ऑगस्ट १९४७ अंक ३३


दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,०५,५५५ |
| खेळतें भांडवल | रु. | ६१,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर



## दि बँक ऑफ कराड, लि.

कराड ( जि. सातारा )

( स्थापना : १२-३-१९४६ )

पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल ... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर

मॅनेजर



## शेअर्स विकणें आहेत.

डुप्लीकेटर्स, शटल्स, प्रोसेस व फोटोग्रॅफिक कॅमेरे व इतर बऱ्याच प्रकारची उंची मशिनरी तयार करणारे सुप्रसिद्ध

मेसर्स शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., बेळगांव.

यांचे विक्रीस काढलेले प्रत्येकीं १० रुपयांचे २०,००० शेअर्सपैकीं फारच थोडे शेअर्स विकाऊ आहेत.

अर्ज व इतर माहितीसाठी खालील पत्त्यावर लिहाः—

आर. जे. सावंत

शेअर्स व स्टॉक ब्रोकर्स

६२, न्यू स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग,

अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

## विविध माहिती

**बर्लिनमध्यें शस्त्रास्त्रांचा गुप्त सांठा**—बर्लिनच्या अमेरिकन लष्करानें व्यापलेल्या भागांतील दोन कारखान्यांत युद्धसामुग्रीचा गुप्त सांठा आढळून आला. अमेरिकन लष्करी पोलिसांनीं हे दोन्ही कारखाने बंद करून कारखान्यांतील प्रमुख अधिकाऱ्यांना अटक केली आहे.

**बल्गेरिआ-युगोस्लाव्हिआ करार**—बल्गेरिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांत नुकताच एक परस्पर सहाय्याचा करार करण्यांत आला. ह्या परस्पर सहाय्यांत उद्योगधंदे, वीज निर्मिति, खाणी, शेती, वहातूक व परराष्ट्रीय व्यापारासाठी कायमचा हुंडणावळीचा दर इत्यादि बाबींचा समावेश करण्यांत आला आहे.

**मद्रास प्रांतांतील प्राथमिक शिक्षण**—मद्रास प्रांतांतील चिंगलपट जिल्ह्यांतील ३२ गांवीं सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. योजनेला याच वर्षी प्रारंभ होणार असून शाळांच्या इमारतींसाठीं जादा होणारा खर्च सरकार देणार आहे.

**कारखाना कायद्याची बिहारमधील व्याप्ती**—बिहारमधील अभ्रकाच्या व लाखेच्या खाणींतील कामगारांची स्थिति सुधारण्यासाठीं बिहार सरकारनें कारखान्याचा व वेतनाचा कायदा, ह्या दोन्ही कायद्यांची व्याप्ती वाढविण्याचें ठरविलें आहे. आतांपर्यंत हे कायदे यंत्रशक्ती वापरणाऱ्या कारखान्यांनाच लागू होते. पण ह्यापुढें २० किंवा अधिक कामगार असणाऱ्या सर्व कारखान्यांना हे कायदे लागू होणार आहेत.

**मुंबई प्रांतांतील सार्वजनिक आरोग्य**—युद्धोत्तर पुनर्घटनेचा एक भाग म्हणून मुंबई सरकारनें प्रांतांतील २६ तालुक्यांतून वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्याचीं केंद्रें उभारण्यास मंजुरी दिली होतीच. या वर्षी आणखी दहा तालुक्यांतून अशीं केंद्रें उभारण्यांत येणार आहेत.

**अलवारला संशोधन संस्था**—पंजाब सरकारचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. खान. ए. रहमान ह्यांना अलवारच्या महाराजांकडून, मधमाशासंबंधी संशोधन संस्था स्थापन करण्यासाठी बोलावण्यांत आलें आहे. डॉ. रहमान येत्या आक्टोबरमध्यें त्यासाठी अलवारला जाणार आहेत. ह्या संस्थेचा उपयोग राजपुताना व मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांना चांगला होईल.

**तेलाच्या खाणींतील नैसर्गिक वायु**—तेलाच्या खाणींतून नैसर्गिक अवस्थेंत सांपडणारा वायु द्रव-स्थितींत आणण्याची एक पद्धत अमेरिकन शास्त्रज्ञांनीं शोधून काढली आहे. द्रवीभूत वायु पूर्वीपेक्षा निम्म्या जागेंत सामाऊं शकतो. शून्याखालीं २६० डिग्री इतक्या तपमानामुळें वायु द्रवीभूत होतो. उष्णता वाढवून परत वायुरूप करून, तो नळीच्या साहाय्यानें वापरतां येतो.

**व्यापारी संघाची सूचना**—दक्षिण हिंदुस्थान व्यापारी संघटनेनें उत्तम प्रतीचा कोळसा रेल्वे इंजिनांसाठी व कारखान्यांतून वापरला जाऊं देऊं नये अशी सूचना मध्यवर्ती सरकारला केली आहे. ह्याशिवाय कोळशाच्या खाणींतून उष्णतामापक केंद्रेंही उभारण्याची सूचना संघातर्फे करण्यांत आली आहे.

**मुंबई प्रांतांतील युरोपिअन आय. सी. एस.**—मुंबई प्रांतांतील २६ युरोपिअन आय. सी. एस. अधिकाऱ्यांपैकीं १९ अधिकाऱ्यांनीं नौकरीची मुदत संपण्यापूर्वीच सेवानिवृत्त होण्याची इच्छा दर्शविली आहे.

## रिझर्व्ह बँकेच नफा-तोटा पत्रक

### तीन वर्षांचे तुलनात्मक आकडे

| उत्पन्न | अखेरचें वर्ष ३० जून १९४५ | अखेरचें वर्ष ३० जून १९४६ | अखेरचें वर्ष ३० जून १९४७ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| व्याज, डिस्कौंट, हुंडणावळ, कमिशन, इ. | १६,६७,५१,७०९ | १५,५८,८४,९८२ | १०,१२,४३,५११ |
| खर्च | १,७८,२४,८१६ | १,५५,४१,८३२ | २,१०,१६,२०२ |
| वाढावा | १४,८९,२६,८९३ | १३,६३,४३,१५० | ८,०२,२७,३०९ |
| **वाढाव्याची वांटणी** | | | |
| ३½% डिव्हिडंड | १७,५०,००० | १७,५०,००० | १७,५०,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ... | ... |
| जादा ½% डिव्हिडंड | २,५०,००० | २,५०,००० | २,५०,००० |
| मध्यवर्ती सरकार-कडे वर्ग | १४,६९,२६,८९३ | १३,४३,४३,१५० | ७,८२,२७,३०९ |

वरील तुलनात्मक आकड्यांवरून, रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न गेल्या वर्षी बरेच घटलें असून खर्च थोडा वाढला आहे आणि डिव्हिडंड कायम असून मध्यवर्ती सरकारच्या वांट्याचा नफ्याचा हिस्सा पुष्कळच लहान झाला आहे, हें दिसून येईल.

### पाऊस केव्हां जास्त पडतो ?

रोजच्या २४ तासांत पडणारा पाऊस समजला, तरी त्याचें तासागणिक पडण्याचें प्रमाण इंजिनिअर, कंत्राटदार, इत्यादींस महत्त्वाचें असतें. १९३० ते १९३९ ह्या मुदतींत पुण्यामध्यें पडलेला पाऊस तासागणिक मोजून, त्याच्या आकड्यांची छाननी करण्यांत आली आहे. जुलै व ऑगस्ट हे दोन महिने वगळले, तर बाकीच्या सर्व काळांत संध्याकाळचे समयीं पाऊस अधिक प्रसंगीं व ज्यास्त प्रमाणांत पडतो, असें आढळून आलें आहे.


सुजलाम् सुफलाम्

मलयजशीतलाम् । सस्यश्यामलाम्...

आपल्या मातृभूमीचें हें चित्र—

प्रत्यक्षांत उतरविण्याची संधि आतां मिळत आहे. त्यासाठीं आपल्या देशाची "सर्वांगीण प्रगति" केली पाहिजे. ही प्रगति कशी व कोणत्या दिशेनें करावयाची हें

किर्लोस्कर

मासिकाच्या खास 'स्वातंत्र्य-अंकां'त वाचा.

हा अंक १५ ऑगस्टला प्रसिद्ध होईल. किंमत ४ आणे.

किर्लोस्कर प्रेस : किर्लोस्करवाडी

# अर्थ

बुधवार, ता. १३ ऑगस्ट, १९४७



प्रो. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## गेलें वर्ष हिंदी बँकांस कसें गेलें ?

### ठेवींत उतार आणि कर्जांत वाढ

३० जून १९४७ अखेर संपलेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें ७ बँका नव्यानें दाखल झाल्या, आणि ३ बँका त्यांतून बाहेर पडल्या. अशा रीतीनें शेड्यूल्ड बँकांची एकूण संख्या ९७ झाली. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत गेलीं कांहीं वर्षे एकसारखी वाढ होत चालली होती; ही प्रवृत्ति पुढें कायम टिकली नाहीं. २२ नोव्हेंबर १९४६ रोजीं ह्या ठेवींनीं उच्चांक गाठला; त्या दिवशीं ठेवींचा आकडा १,०९७३⁄४ कोटी रुपये झाला. २७ जून, १९४७ रोजीं हा आकडा १,०१३३⁄४ कोटी रुपयांवर उतरला. चालू ठेवी वगळून बाकीच्या ठेवींत सुमारें ३५ कोटी रुपयांची वाढ झाली. बँकांकडे कर्जाची मोठी मागणी येत राहिल्यानें, त्यांनीं दिलेल्या कर्जांची रकम ३५५ कोटी रुपयांवरून ४१४ कोटी रुपयांवर गेली. अहवालाचे वर्षी रिझर्व्ह बँकेनें ९५ बँकांना मिळून ३० कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं; १९४५-४६ मध्यें फक्त १२ बँकांनीं ३१⁄३ कोटी रुपयांचीं कर्जे घेतलीं होतीं. १९४६-४७ मध्यें दोन सहकारी बँकांनींहि रिझर्व्ह बँकेकडून कर्जे घेतलीं. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची एकूण संख्या ३,१४५ वरून ३,५६६ झाली; म्हणजे त्यांत ४२१ कचेऱ्यांची भर पडली. त्यापूर्वीच्या वर्षी कचेऱ्यांच्या संख्येंत ४३० कचेऱ्यांची वाढ झाली होती. बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या १९४६-४७ अखेर ६५९ झाली; म्हणजे ती २८ नें वाढली. त्यांचे कडील एकूण ठेवी ६७३⁄४ कोटि रुपयांच्या ७८१⁄२ कोटि रुपये झाल्या.

### बँकांची तपासणी

रिझर्व्ह बँकेनें अहवालाचे वर्षी ऑर्डिनन्सखाली १९ व रिझर्व्ह बँक कायद्याखाली ४ बँकांची तपासणी केली. एका बँकेच्या तपासणीचें काम रिपोर्टाचे तारखेस चालूच होते. वरील १९ बँकांपैकी ९ बँकांच्या तपासणीचा रिपोर्ट सरकारकडे धाडण्यांत आला. ऑर्डिनन्सप्रमाणें, एका बँकेस १३ जानेवारी, १९४७ पासून नव्या ठेवी घेण्याची बंदी करण्यांत आली आणि दुसरीस शेड्यूलमध्यें प्रवेश नाकारण्यांत आला. दोन बँकांचा कारभार समाधानकारक वाटल्यामुळें उपाययोजना आवश्यक राहिली नाहीं. बाकीच्या बँकांबाबतच्या तपासणी रिपोर्टांचा विचार हिंदुस्थान-सरकार अद्याप करीत आहे.

### सर चिंतामणराव देशमुख ह्यांचा सल्ला

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलेल्या आपल्या भाषणांत हिंदी बँकांच्या कारभारांत सुधारणा घडून येण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. सट्टेबाजीच्या स्वरूपाच्या उपक्रमांस कर्जे देण्यांतील धोक्याकडे रिझर्व्ह बँकेनें अनेकवार लक्ष वेधलेलें असलें तरी कित्येक बँकांनीं, विशेषतः लहान बँकांनीं, त्यापासून बोध घेतलेला दिसत नाहीं. सहाजिकच, त्यापैकीं कित्येक संकटांत आल्या. गेल्या वर्षी कर्जास मागणी एकसारखी वाढत गेली, परंतु तिचें कारण व्यापार व कारखानदारी ह्यांतील सुधारणा हें नव्हतें. भडकलेले बाजार भाव आणि सट्ट्याच्या स्वरूपाची मालाची आयात ह्यांमुळें बँकांकडे कर्ज मागणी आली आणि कित्येक बँकांनीं ती गैरसावधपणें पुरवलीहि ! रिझर्व्ह बँकेनें ह्या संबंधांत वेळोवेळ धोक्याची सूचना दिलेली होती. कर्जेरोख्यांच्या खरेदी-विक्रींतील नफा हा वास्तविक गंगाजळीकडे जावयास पाहिजे. परंतु कित्येक बँकांची प्रवृत्ति ह्या नफ्यांतून डिव्हिडंड वाटण्याकडे आहे. हें धोरण सावधगिरीस धरून नाहीं. कित्येक बँका आपले ताळेबंद सजवून दाखवितात. ह्या गोष्टीबद्दलहि सर चिंतामणरावांनीं नापसंती दाखविली आहे. सजविलेल्या कृत्रिम ताळेबंदामुळें बँकांची वस्तुस्थिति निदर्शनास येत नाहीं आणि त्यांचेविषयीं अकारण विश्वास निर्माण होतो, तो कालांतरानें त्यांच्या नाशास कारणीभूत होण्याचा संभव असतो, असा गंभीर इशारा सर चिंतामणरावांनीं दिला आहे. गेल्या वर्षी कांहीं बँकांना अडचणी सोसाव्या लागल्या, त्यांत बिगर शेड्यूल्ड म्हणजे लहान बँकांचाच भरणा मोठा होता. गैर व्यवस्था, लहान-सहान अनेक कचेऱ्या उघडण्याची घिसाडघाई, कर्जे देण्यांत बेफिकीरपणा, शेअर बाजारांत केलेले सोडतीचे व्यवहार आणि योग्य तऱ्हेनें शिक्षण घेतलेल्या नोकर वर्गाचा अभाव, ह्या कारणांमुळेंच त्या बँकांची अशी अवस्था झाली. त्यांचे मदतीस रिझर्व्ह बँक गेली, तरी ती मदत किती पुरणार? ज्या बँकांस त्यांच्या आवाक्या बाहेरील कारणांमुळें अडचण निर्माण होते, त्यांस रिझर्व्ह बँक वेळींच योग्य सल्ला देऊन सहाय करूं शकते. रिझर्व्ह बँकेच्या सहायाविषयीं अवास्तव अपेक्षा करणारांस बँकेच्या मदतीच्या क्षेत्राची नीट कल्पना येण्यास वरील खुलासा उपयोगी पडेल.

### रिझर्व्ह बँकेच्या शेअर्सची प्रादेशिक वांटणी

रिझर्व्ह बँकेच्या भागांची प्रादेशिक वांटणी मूळ योजनेप्रमाणें टिकली नसून, ती कशी बदलत गेली आहे, हें खालील तक्ता दर्शवितो. मुंबई आणि कलकत्ता विभागांनीं गेल्या वर्षी इतर विभागांकडून अनुक्रमें ३०८ व १,६८९ भाग आकर्षिले.

भागांची वाटणी

| | १ एप्रिल १९३५ | ३१ डिसें. १९३६ | ३० जून १९४६ | ३० जून १९४७ |
|---|---|---|---|---|
| मुंबई | १,४०,००० | १,८९,९२८ | २,३६,३२१ | २,३६,६२९ |
| कलकत्ता | १,४५,००० | १,३१,४२३ | १,२४,६२९ | १,२६,३१८ |
| दिल्ली | १,१५,००० | ९७,३१४ | ७९,२२० | ७८,९५५ |
| मद्रास | ७०,००० | ६१,२१७ | ५१,०४२ | ४९,६६० |
| रंगून | ३०,००० | २०,२०८ | ८,७८८ | ८,४३८ |
| एकूण | ५,००,००० | ५,००,००० | ५,००,००० | ५,००,००० |

१ एप्रिल, १९३५ रोजीं बँकेचे एकूण भागीदार ९२,०४७ होते आणि त्यांचेमध्यें ५,००,००० भाग वाटले गेले होते. म्हणजे, प्रत्येक भागीदारानें सरासरीनें ५·४ भाग धारण केले होते. ३० जून, १९३६ रोजीं भागीदारांची संख्या ६६,२७३ झाली व १९४६ व १९४७ मध्यें ती अनुक्रमें ४५,६९२ व ४५,०३१ झाली. म्हणजे, आतां प्रत्येक भागीदाराजवळ सरासरीनें ११·१ भाग आहेत.

## स्फुट विचार

### आणखी दोन वर्षे अन्न-धान्याची तूट

संयुक्तराष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी संघटनेचे प्रमुख, सर जॉन बॉइड ऑर यांनीं असा इशारा दिला आहे कीं, युद्धामुळें उध्वस्त झालेल्या देशांना १९४८ सालचें पीक पदरांत पाडून घेण्यासाठीं शेतींचीं अवजारें दिलीं नाहींत तर सध्यांची अन्नधान्याची तूट आणखी दोन वर्षे तरी इतकीच भयंकर राहील. वरील संघटनेच्या वार्षिक अहवालांत त्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, आजची अन्नधान्याची परिस्थिति एक वर्षापूर्वीपेक्षां अधिक चांगली नाहीं; इतकेंच नव्हे तर ज्या देशांतील लोक अन्न कसें मिळवावें या विवंचनेंत असतील त्या देशांतून आर्थिक विकास अगर राजकीय स्थैर्य हीं नांदण्याची आशाही खोटीच आहे. सर साहेबांच्या मतानें शेतीचें शास्त्र जगभर अंमलांत आणतां येण्यासारखे आर्थिक उपाय योजण्यांत आले, तर जगाला अन्नाचा पुरवठा करतां येईल. पण त्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व घटकांनीं सहकार्य करून जगाची सध्याच्या भयानक परिस्थितींतून सुटका केली पाहिजे. जगाच्या अन्नपुरवठ्याच्या बाबत एकमुखी विधायक योजना आखतां आली नाहीं तर संयुक्तराष्ट्र संघटनेचा शेवट होण्याचा धोका निर्माण होईल, हा त्यांनीं दिलेला इशारा विचारणीय आहे. कारण, अन्नासारख्या महत्वाच्या बाबतींत जर संयुक्तराष्ट्र संघटनेंतील राष्ट्रांचें एकमत होऊंच शकलें नाहीं तर इतर बाबतींत तें किती होईल ह्या विषयीं निराशा वाटणें साहजिकच आहे. ज्या देशांतून आज अन्नधान्य निर्यात केलें जातें, त्यांनीं अन्नधान्याच्या पैदाशींत वाढ केली तरी योग्य उपायांच्या अभावीं धान्य बाजारांत पडून राहण्याचाही संभव आहे. असें होऊं नये म्हणून आधींच उपाययोजना ठरविली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आरोग्य व कामाची कार्यक्षमता राखण्याइतकें अन्न मिळण्यासाठीं, येत्या २५ वर्षांत अन्न-धान्याचें उत्पादन आजच्या दुप्पट वाढलें पाहिजे असा अंदाज आहे.

---

### सावकारीवर नियंत्रण

१९४६ च्या सावकारीच्या कायद्याच्या ३९ व्या कलमाखालीं एक नोटिफिकेशन काढून मुंबई सरकारनें तें संबंधित लोकांच्या माहितीसाठीं प्रसृत केलें आहे. ह्या नोटिफिकेशनबद्दल कोणाच्या कांहीं तक्रारी अगर सूचना असतील, तर त्या ता. १८ ऑगस्टपर्यंत मुंबई सरकारच्या रेव्हेन्यू खात्याच्या सेक्रेटरीकडे कळवावयाच्या आहेत. सावकारांचें नोंदबुक एका विशिष्ट पद्धतीनें ठेवण्यांत यावयाचें आहे. सावकारीच्या धंद्यासाठीं लागणारा परवाना मिळविण्यासाठीं सरकारी नमुन्यावर असिस्टंट रजिस्ट्रारकडे अर्ज करावयाचे आहेत. परवान्यासाठीं प्रथमच अर्ज करावयाचा असेल तर तो केव्हांही केला तरी चालेल; परंतु फेर-परवान्यासाठीं करावयाचा अर्ज मात्र ज्या वर्षासाठीं परवाना पाहिजे असेल त्याच्या पूर्वीच्या मे महिन्यांत करावयाचा आहे. अर्जदारांनीं परवाना-अर्जासोबत एक जबाब सादर करावयाचा आहे. ह्या जबाबांत आपण आतापर्यंतच्या सावकारी व्यवहारांत कपट अगर अप्रामाणिकपणा केलेला नाहीं याची ग्वाही द्यावयाची आहे. असिस्टंट रजिस्ट्रार अर्जदारांच्या अर्जाची तपासणी करून त्यांच्या सद्धेतूविषयीं चांचणी करील. अशा चांचणीचे कागदपत्र तो तयार करील. परवान्यासाठी पांच रुपये फी ठेवण्यांत आली असून ती ठरलेल्या मुदतींत रजिस्ट्रारच्या कचेरींत किंवा ट्रेझरींत, सब ट्रेझरींत अगर रिझर्व्ह बँकेंत भरावयाची आहे, व पावतीसह चलन रजिस्ट्रारकडे पाठवावयाचें आहे. अर्जदाराचा अर्ज नाकारण्यांत आल्यास त्या संबंधींच्या कारणासहित अर्जदाराला तसें कळविलें जाईल. रजिस्ट्रारनें परवाना देण्याचें नाकारल्याचें कळविल्यापासून ३० दिवसांच्या आंत अर्जदाराला अपील करतां येईल. रजिस्ट्रार अर्जदाराचें अगर त्याच्या वकिलाचें म्हणणें ऐकून घेऊन अपीलाचा निकाल देईल. रोखीचें पुस्तक, खातेवही वगैरेसाठीं वेगळे नमुने मुकर केलेले आहेत. सावकारानें आपल्या कुळांना, हिशेबाचे वर्ष संपल्यावर ६० दिवसांच्या आंत, दिलेल्या वेगळया नमुन्याप्रमाणें वार्षिक हिशोबाचा तक्ता द्यावयाचा आहे.

---

### इंडोनेशिआंत हिंदी भांडवलाची कंपनी

युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका ह्या वृत्तसंस्थेनें अशी माहिती प्रकट केली आहे कीं, एक हिंदी उद्योगपती इंडोनेशिआंत २० कोटी रुपये भांडवलाची कंपनी काढणार आहे. कंपनी इंडोनेशिआंत आणि जरूर पडली तर हिंदुस्थानांत नोंदण्यांत येणार असून, तिचा उद्देश इंडोनेशिआंत कापडाच्या गिरण्या व इतर कांहीं उद्योगधंदे काढण्याचा आहे. कंपनीचें भांडवल १० रुपयांचा एक भाग ह्याप्रमाणें २ कोटी भागांत विभागण्यांत येणार आहे. भांडवलापैकीं ५१ टक्के भांडवल इंडोनेशिअनांचें रहाणार असून उरलेलें ४९ टक्के भांडवल हिंदुस्थानांत विकण्यांत येईल. पण हें ४९ टक्के भांडवलही मूठभर धनिकांच्या हातीं न रहातां बऱ्याच भागीदारांत वाटलें जाईल अशी व्यवस्था करण्यांत येणार असल्याचें समजतें. ह्या कंपनीविषयीं एक शंका अशी घेण्यांत येत आहे कीं खुद्द हिंदुस्थानालाच भांडवली मालासाठीं ब्रिटन-अमेरिकेसारख्या देशांकडे धांव घ्यावी लागत असतां अशा प्रकारचा माल हिंदुस्थानामार्फत इंडोनेशिआला कोठून मिळणार ?

---

### शिवण्याच्या यंत्राचा देशी धंदा

शिवण्याचीं यंत्रें तयार करण्याच्या हिंदुस्थानांतील धंद्याविषयीं टॅरिफ बोर्डानें संरक्षणाची शिफारस केली आहे. ह्या धंद्याविषयीं टॅरिफ बोर्डानें जमा केलेली माहिती आणि केलेल्या सूचना धंदेवाइकांना उपयुक्त वाटल्याशिवाय रहाणार नाहींत. बोर्डानें असा अंदाज केला आहे कीं, येत्या तीन वर्षांत शिवण्याच्या यंत्रांची देशांतील मागणी १,२०,००० यंत्रांच्या आसपास जाईल. यंत्रांचें उत्पादन मात्र १९४८-४९ सालांत फक्त १७,००० नगांइतकें होईल. ह्या धंद्याला लागणारी सर्व सामुग्री देशांतच मिळण्यासारखी असल्यानें धंद्याला उत्तेजन देणें योग्यच आहे. धंद्याला लागणाऱ्या तज्ञ माणसांची वाण ही एक अडचण, इतर अडचणींबरोबर आहेच. पण सगळ्यांत मोठी अडचण अशी आहे कीं देशी शिवण्याचीं यंत्रें घेण्याला गिऱ्हाईक नाखूष असतें. ह्यावर उपाय म्हणून बोर्डानें असें सुचविलें आहे कीं परदेशी यंत्रांपेक्षा देशी यंत्रांच्या किंमती १९४६-४७ सालांत ५० रुपयांनीं कमी असाव्या; १९४७-४८ सालांत ४० रुपयांनीं कमी असाव्या; आणि १९४८-४९ सालांत ३० रुपयांनीं कमी असाव्या. बोर्डानें सुचविलेला उपाय तात्पुरत्या स्वरूपाचा म्हणून योग्य मानला तरी चांगला माल तयार करणें हाच उपाय कायमच्या यशाच्या दृष्टीनें इष्ट ठरेल.

### ब्रिटिश कंपनींत हिंदी भागीदारांस वाव

मेसर्स गिलँडर्स आर्बुथनॉट अँड कं. ह्या १२८ वर्षांच्या जुन्या ब्रिटिश व्यापारी फर्मनें हिंदी भांडवलदारांस आपले कांहीं भाग देऊं करून पब्लिक लिमिटेड कंपनींत आपलें रूपांतर करण्याचें ठरविलें आहे. ह्या फर्मची कलकत्ता येथें १८१९ सालीं स्थापना झाली. ताग, रेल्वे, रोपवेज, कोळसा, इंजिनिअरिंग, बिल्डिंग, चहा, केमिकल्स, इत्यादि अनेक मोठ्या कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी तिचेकडे आहे. मुंबई, मद्रास, दिल्ली, लाहोर, कानपूर व रंगून येथें तिच्या शाखा आहेत. फर्मच्या चार भागीदारांना त्यांच्या भागांच्या ९९% भागांच्या खरेदीसाठी ८९,९०,००० रु. द्यावयाचे आहेत, त्यापैकीं १४,९०,००० रु. गुडविलचे आहेत. कंपनीच्या व्यवस्थेमध्यें कांहींहि फरक होणार नाहीं. कंपनीच्या सहा डायरेक्टरांपैकीं चौघे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत त्या प्रत्येकास ३,५०० रु. दरमहा पगार, कांहीं ठराविक अलाउन्सेस व नफ्यांत हिस्सा मिळावयाचा आहे. कंपनीच्या भांडवलापैकी फक्त ३४.५% भांडवल जनतेस उपलब्ध करण्यांत येत असल्यानें, कंपनीचे शेअर्स मुंबई स्टॉक एक्सचेंजवर येणार नाहींत. बहुसंख्य भाग उत्पादकांनीं स्वतः जवळच ठेवलेले आहेत.

---

### भांडवल उभारणीवरील निर्बंध

भांडवल उभारणीवर निर्बंध १७ मे, १९४३ रोजीं एका ऑर्डिनन्सच्या द्वारा घालण्यांत आले. चलनविस्तारास आळा घालणें, हा त्याचा मूळ उद्देश होता; परंतु हे निर्बंध ह्यापुढें ३ वर्षें चालू ठेवण्याचा उद्देश "देशांतील भांडवलाची गुंतवणूक कारखाने, शेती, इत्यादींत प्रमाणबद्धतेनें व्हावी" असा आहे. जून १९४६ ते मे १९४७ ह्या ११ महिन्यांत ६१२ कंपन्यांना ३५५ कोटि रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली; म्हणजे मे १९४३ पासून एकूण ५,०४६ कंपन्यांना ६८१ कोटि रुपयांच्या भांडवल उभारणीची परवानगी मिळाली. खालील तक्त्यांत तपशील दिला आहे:—

(आकडे कोटि रुपयांचे)

| वर्गवारी | कंपन्यांची संख्या | परवानगी दिलेलें भांडवल |
|---|---|---|
| औद्योगिक | २,५२८ | ४०८ |
| शेतीविषयक | ३५३ | २६ |
| बँका, विमा | ७२३ | १०७ |
| व्यापार व वहातुक | १,०९० | ११२ |
| इतर | ३५२ | २८ |
| एकूण बिगर–औद्योगिक | २,५१८ | २७३ |
| एकूण (औद्योगिक व बिगर–औद्योगिक) | ५,०४६ | ६८१ |

बँकांचे आणि विमा कंपन्यांचे भांडवल उभारणीचे अर्ज हिंदुस्थान सरकारकडे गेले, म्हणजे ते रिझर्व्ह बँकेकडे तिच्या अभिप्रायाकरितां पाठविण्यांत येतात. निर्बंध बसविल्यापासून आतांपर्यंत बँकेनें अशा प्रकारें १,३१० अर्जांवर आपला अभिप्राय व्यक्त केला; त्यापैकीं १,०१७ अर्ज बँकांचे व २९३ अर्ज विमा कंपन्यांचे होते.

---

**सिलोनमध्यें कागदाची गिरणी**—सिलोन सरकार एका ब्रिटिश तज्ज्ञाच्या सहाय्यानें कागदाची गिरणी काढण्याचा विचार करीत आहे. गिरणी प्रत्यक्ष उभी रहाण्यास तीन वर्षें लागतील. गिरणींत सुमारें ६५½ लाख रुपयांचे भांडवल गुंतविलें जाईल असा अंदाज आहे.

## विविध माहिती

**जर्मन चित्रपटांची निर्यात**—जर्मन चित्रपटांना जगाचा बाजार पुन्हां खुला करण्यांत आल्याचे अमेरिकन परराष्ट्रीय खात्यानें जाहीर केलें आहे. जर्मनीच्या शांतताकालीन अर्थव्यवस्थेला त्याची जरूरी आहे, असें कारण सांगण्यांत आलें आहे. मात्र जर्मनी दोस्त राष्ट्रांनीं व्यापल्यानंतर जे चित्रपट निघाले असतील त्यांनाच ही सवलत दिली जाणार आहे.

**हिंदुस्थान-जपान व्यापार**—ब्रिटिश हिंदुस्थानांतील व्यापारी संस्थांना अगर व्यक्तींना जपानशीं खाजगी व्यापार करण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारनें दिली आहे. ह्या व्यापारावरील आयात-निर्यातीचीं व इतर बंधनें मात्र त्यांना पाळावी लागतील. यापुढील व्यापारांतून मिळविलेला पैसा अगर मालमत्ता ह्यावर ब्रिटिश इंडिअन कस्टोडिअनचा ताबा रहाणार नाहीं.

**मलबारमधील सुधारणा**—मलबारमध्यें सध्या चालू असलेली जमीन धारण करण्याची पद्धत मोडून, त्याऐवजीं मद्रास प्रांतांतील पद्धत तेथें सुरू करण्यांत येणार आहे असें समजतें. मलबारमधील शेतकऱ्यांना तात्पुरती मदत देण्याचेही मद्रास सरकारनें ठरविलें असून, त्यासंबंधीचा कायदा मद्रासच्या विधिमंडळांत सप्टेंबर महिन्यांत सरकारतर्फे मांडण्यांत येणार आहे.

**ब्रिटिश सैन्य ग्रीस सोडणार**—ग्रीसमधील प्रमुख ब्रिटिश अधिकाऱ्यानें ग्रीसच्या सरकारला, ब्रिटन आपलें लष्कर ग्रीसमधून काढून घेणार असल्याचा निर्णय कळविला आहे. सैन्य काढून घेण्याची तारीख अजून निश्चित झालेली नाहीं. ग्रीसमध्यें ब्रिटनचें अंदाजें ३,५०० लष्कर असावें.

**राष्ट्रसंघाची मालमत्ता**—पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाची सुमारें साडेपासष्ठ लक्ष पौंडांची मालमत्ता संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आणि आंतरराष्ट्रीय मजूर कचेरीच्या नांवानें वर्ग करण्यांत आली आहे. या मालमत्तेंत जिनीव्हा येथील सुसज्ज इमारत असून तिचीच किंमत साडेसत्तावीस लाख पौंड आहे.

**फेरीवाल्यांचे परवाने रद्द**—मुंबई सरकारनें फेरीवाल्या कापड विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्याचें ठरविलें आहे. ह्या फेरीवाल्यांचा कापडाच्या काळ्या बाजारांत बराच हात आहे असें सरकारचें म्हणणें आहे.

**गरीब कुळांना कायद्याची सरकारी मदत**—गरीब आणि मागासलेल्या जातींतील शेतकऱ्यांना जमिनीसंबंधीं दावे मांडण्यासाठी मदत करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ज्या शेतकऱ्याला अशी मदत पाहिजे असेल त्यानें आपापल्या हद्दींतील मामलेदाराकडे अर्ज करावयाचा आहे. दाव्यांत कुळाच्या बाजूचा निकाल लागल्यास वकिलाचा व इतर खर्च देण्याची लेखी कबुली मात्र कुळाकडून लिहून घेण्यांत येणार आहे.

**ए. बी. सी. बँक**—ए. बी. सी. बँकचे धनको आणि भागीदार ह्यांच्या दोन निरनिराळ्या सभा हायकोर्टाच्या सूचनेप्रमाणें भरून त्या अनुक्रमें २२ व २३ ऑगस्टपर्यंत तहकूब करण्यांत आल्या. बँकेची सध्याची परिस्थिति धनकोसमोर मांडण्यांत आली. बँकेच्या पुनर्घटनेबद्दलच्या योजनेवर विचार झाला नाहीं. कारण, बँकेचे धनको आणि डायरेक्टर ह्यांच्या दरम्यान चालू असलेल्या वाटाघाटी लक्षांत घेऊन सभा पुढें ढकलण्यांत यावी असा एका धनकोनें आणलेला ठराव मंजूर झाला. त्यानंतर बँकेच्या भागीदारांनींही आपली सभा २३ ऑगस्टपर्यंत पुढें ढकलली.

## पोस्टांतील विमे, ठेवी व सर्टीफिकिटें

### हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांची योजना

ज्यांनीं पोस्टांत विमे उतरलेले असतील, त्यांच्या विम्यांच्या परतफेडीची जबाबदारी हिंदुस्थानानें पत्करावयाची, का पाकिस्तानानें पत्करावयाची ह्याचा अधिकृत खुलासा प्रसिद्ध झाला आहे. विमेदार कोणत्या सरकारचा नोकर ह्यापुढें राहील किंवा कोणत्या सरकारचे हद्दींत वास्तव्य करील, ह्यावरून ती जबाबदारी ठरविली जाईल. दोन्ही सरकारांच्या प्रतिनिधींनीं ह्या व्यवस्थेस मान्यता दिली आहे.

पोस्टल सेव्हिंग्ज बँकेचे खातेदार व डिफेन्स सेव्हिंग्ज आणि नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकिटे धारण करणारे लोक ह्यांना आपलीं खातीं किंवा सर्टीफिकिटें कोणत्याहि देशांतील कोणत्याहि पोस्टांतून दुसऱ्या देशांतील कोणत्याहि पोस्टांत ३१ मार्च, १९४८ पर्यंत वर्ग करतां येतील. ह्या व्यवस्थेसहि दोन्ही सरकारांच्या प्रतिनिधींनीं मान्यता दिली आहे.

### श्री. झाडबुके ह्यांचा पदवीत्याग

बार्शी येथील प्रसिद्ध नागरीक व धी जयशंकर मिल्स बार्शी, लि. या गिरणीचे मॅनेजिंग एजंट श्री. रा. गणपत रामलिंगआप्पा झाडबुके यांनीं आपल्या " रावबहादूर " या पदवीचा त्याग केला असून, त्याप्रमाणें त्यांनीं व्हाईसराय यांना कळविलें आहे. देशांतील बदलणाऱ्या राजकीय परिस्थितीचा व स्वतंत्र हिंदुस्थानच्या घटनेचा विचार करून त्यांनीं हा पदवीत्याग केला असावा, असे वाटतें.

### भारी किंमतीच्या नोटा किती बदलून घेतल्या ?

१२ जानेवारी, १९४६ रोजीं ऑर्डिनन्सचे अन्वयें भारी किंमतींच्या नोटांचा कायदेशीर चलनपणा रद्द झाला. ११ जानेवारी १९४६ रोजी अशा प्रकारच्या १४३ कोटि, ९७ लक्ष रुपयांच्या नोटा प्रचलित होत्या. त्यांपैकी १३४ कोटि, ९० लक्ष रुपयांच्या नोटांची मोड देण्यांत आली आहे. २८ फेब्रुवारी १९४७ नंतर मोड मागणारे अर्ज विचारांत घेतले जात नाहींत.

---

**मध्यवर्ती सरकारच्या मदतींत कपात**—प्रांतिक सरकारांच्या युद्धोत्तर योजनांस मध्यवर्ती सरकारनें कांहीं देणग्या मंजूर केल्या होत्या, त्यांत आतां कपात केली जाणार आहे, असें मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारांस कळविलें आहे.

**स्वातंत्र्य दिनानिमित्त शेतकऱ्यांस सूट**—स्वातंत्र्य दिनानिमित्त चालू वर्षाच्या जमीन महसुलांत मुंबई सरकारनें १०% सूट जाहीर केली आहे. ही सूट देऊन उरलेल्या रकमेवरच लोकल फंड पट्टी आकारली जाईल.

**मुंबई म्युनिसिपॅलिटीचें यशस्वी कर्ज**—मुंबई म्युनीसिपॅलिटीनें १९७७ मध्यें परत फेडीचे ३¼% व्याजाचें कर्ज उभारलें, तेव्हां आलेल्या अर्जांपैकीं निम्म्या अर्जांसच कर्जरोखे मिळूं शकले. बाजारांत कर्जरोख्यांचा भाव १००–४ पर्यंत चढला.

**भारत बँक लि., दिल्ली**—शेठ रामकृष्ण डालमिया हे अध्यक्ष असलेल्या वरील बँकेचें वसूल भांडवल २ कोटि रुपयांवर असून तिचेकडे ९२ कोटींच्या ठेवी आहेत. गेल्या वर्षांत ठेवींची रक्कम ४ कोटि, ८९ लक्ष रुपयांनीं उतरली. बँकेचा ताळेबंद ३१ मार्च, १९४७ अखेरचा आहे.

## अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा खर्च

मध्यवर्ती सरकारनें १५ जानेवारी १९४७ पर्यंत निरनिराळ्या प्रांतांगणिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी पुढीलप्रमाणें खर्च केला आहे.

| प्रांत | कर्ज ( रुपये ) | मदत ( रुपये ) |
|---|---|---|
| आसाम | ३४,४७,००० | २९,१६,००० |
| बंगाल | १,९८,३७,००० | ११२,९९,००० |
| बिहार | ९,६४,००० | ५९,६२,००० |
| मुंबई | १७,२३,००० | १३१,०९,००० |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | १,४८,१६,००० | ४५,७०,००० |
| मद्रास | १,९१,८८,००० | २,९९,५९,००० |
| सरहद्द–प्रांत | २६,९०,००० | २०,२०,००० |
| ओरिसा | ५३,७०,००० | ३६,४५,००० |
| पंजाब | ... ... ... | ३०,१२,००० |
| सिंध | ... ... ... | १२,५२,००० |
| संयुक्त प्रांत | ... ... ... | ६८,३०,००० |
| एकूण | ६,५०,३४,००० | ८,९५,७४,००० |

पीकपाण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील कोणतें वर्ष सर्वसामान्यपणें बरें धरावें याविषयीं खात्रीलायक माहिती मिळूं शकत नाहीं. तथापि १९४२–४३ ते १९४४–४५ या तीन वर्षांतील अन्नधान्याच्या उत्पादनाच्या सरासरींत, १९३६–३७ ते १९३८–३९ या तीन वर्षांच्या सरासरीपेक्षा किती वाढ अगर घट झाली हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

| पीक | सरासरी १९३६–३७ ते १९३८–३९ | सरासरी १९४२–४३ ते १९४४–४५ | उत्पादन हजार टनाचे आकडे + अगर– |
|---|---|---|---|
| तांदूळ | २५,१२७ | २६,३५५ | + १,२२८ |
| गहू | ८,१५० | ८,४९१ | + ३४१ |
| ज्वारी | ४,२६५ | ४,३२९ | + ६४ |
| बाजरी | १,८८६ | २,६०९ | + ७२३ |
| नाचणी | १,२३० | १,१६२ | – ६४ |
| मका | १,८७३ | २,२९१ | + ४१९ |
| बार्ली | २,०८३ | २,१९३ | + ११० |
| डाळ | ३,२५८ | ३,६८५ | + ४२७ |
| एकूण | ४७,८७१ | ५१,११५ | + ३,२४४ |

वरील सहा वर्षांच्या काळात वाढलेलें अन्नधान्याचें उत्पादन कायम स्वरूपाचें आहे असें मानण्यास हरकत नाहीं. यावरून सरकारच्या अन्नधान्याच्या मोहिमेला एकंदरींनें थोडेंफार यश आलें, असें दिसून येईल.



## शेतकरी ऋणविमोचन कायद्याचें विवेचन

(रा. सा. य. द. खोले यांचें तारीख २५।७।१९४७ रोजी मुंबई रेडियोवर झालेलें भाषण रेडियो अधिकाऱ्यांचे कृपेनें उद्धृत केलें आहे.)

मराठी मायबोली बोलणाऱ्या माझ्या बंधूनो, आज मी आपणांस मुंबई सरकारनें कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधानें जो कायदा केला आहे त्यासंबंधीं थोडक्यांत माहिती देणार आहें.

आपल्या या देशांतील लोकं मुख्यतः धान्य पिकविणारे शेतकरी असून ते खेडेगांवांतून विखुरलेले आहेत. शेतकरी समाजाचें मुख्य उपजीविकेचें साधन शेती होय. अनिश्चित पाऊस, खतें व शेतीचीं आधुनिक साधनें नसल्यामुळें व मालाच्या निश्चित किंमती ठरल्या नसल्यामुळें शेती फायदेशीर होऊं शकत नाहीं. युद्धजन्य परिस्थितींत सरकारनें धान्याच्या किंमती नियंत्रित केल्या आहेत हें खरें परंतु याबाबतचें पुढील धोरण अद्याप निश्चित नाहीं. शिवाय शेतीस जोडून असे दुसरे उत्पादक जोड धंदे नसल्यामुळें शेतकरी समाजाची आर्थिक स्थिति वाईट होते व त्यामुळें पैशाची नेहमीं अडचण पडते.

### कायद्याची पार्श्वभूमि

फार काळापासून शेतकरी समाजास लागणारा पैसा सावकाराकडून मिळत आहे. हें कर्ज मुख्यतः जमीन, घरें अगर सोनें-चांदी यांचे तारणावर मिळतें. व्याजाचा दर निश्चित नसला तरी तो जबर असतो. कर्ज देतांना परतफेडीची ऐपत किंवा कर्जदार शेतकरी ऋणमुक्त व्हावा ही भावना प्रायः नसते व कर्ज काढतांना शेतकरी हें कर्ज उत्पादन वाढविण्यासाठीं न काढतां शेतीबरोबरच सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी काढतो. याचा परिणाम असा होतो कीं शेतकरी कर्जाचे पायीं बुडून आपल्या जमिनीस मुकून दुसऱ्या उद्योगास लागतो. आधुनिक काळांतील शासन संस्थांना या सर्व प्रश्नांचा काळजीपूर्वक विचार करावा लागला. सावकार व कर्जदार यांचेमध्यें वाढणारा असंतोष व त्याचे होणारे परिणाम यासाठी शेतकऱ्यांना सावकारापासून योग्य संरक्षण देण्यासंबंधीं कायदे झाले व त्याहीबरोबर शेतकऱ्यांना योग्य दरानें योग्य वेळीं व कारणासाठी परत फेडीच्या सोईस्कर हप्त्यांनीं कर्जे देण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. सरकारही तगाईच्या रूपानें कांहीं रक्कम कर्जाऊ देते. परंतु या सर्व व्यवस्थेमुळेंहि खाजगी कर्ज देणें-घेणेवर आळा न बसल्यानें शेतकरी कर्जाच्या ओझ्याखालीं होता तसाच राहिला. या सर्व प्रश्नांचा विचार करतांना असें आढळून आलें कीं, शेतकऱ्यांच्या कर्जाचा विचार करून कायद्यानें त्यांत कर्ज ऋणमुक्तेची योजना तयार करून ती अंमलांत आणल्यास व शेतकऱ्यांची एकूण जिंदगी व त्याचें सर्व कर्ज या सर्वांचा एकत्र विचार करून त्या कर्जाच्या फेडीसंबंधीं कांहींतरी व्यवस्था केल्यास शेतकरी कर्जातून मुक्त होईल व पुन्हा कर्जदार होणार नाहीं व त्याबरोबर त्यास चालू शेतीसाठी लागणारें कर्ज सवलतीचे दरानें व योग्य फेडीची व्यवस्था करून व्हावी असा विचार सुरू झाला. त्याप्रमाणें, मुंबई सरकारनें सन १९३९ सालीं एक कायदा करून शेतकरी कर्जदार यांना ऋणमुक्त करण्याबाबत योजना केली व प्रयोगादाखल तो इलाख्यांतील कांहीं जिल्ह्यांतील दोन दोन विशिष्ट तालुक्यांना लागू केला व पुढें तो इलाख्यांतील ९६ तालुक्यांना लागू केला व आतां तो सर्व इलाख्याला लागू झाला आहे. जुन्या कायद्यांतील कांहीं अपुऱ्या गोष्टी व आलेले अनुभव लक्षांत घेऊन सन १९३९ चा कायदा नुकताच दुरुस्त केला आहे.

हा कायदा मुख्यतः खालील तत्वांवर तयार करण्यांत आला आहे:—

१. शेती करणारा शेतकरी हा कर्जमुक्त झाल्यास शेती उत्तम तऱ्हेनें करील.

२. कर्जमुक्ततेच्या योजनेबरोबरच भावी अवश्य त्या आर्थिक सहाय्याची पूर्ण योजना.

३. कर्जमुक्ततेचें काम न्यायदानाचा अनुभव असणाऱ्यांकडे सोंपवून त्यांनी तें ठराविक मुदतींत संपविलें पाहिजे.

४. कर्जदाराची कमी केलेली जी रक्कम ठरेल ती एकदम सावकार अगर सोसायटी यांना देणेची व्यवस्था.

### कायद्याचा उद्देश

या कायद्याचा मुख्य उद्देश असा कीं ज्यांचा मुख्य धंदा शेती असून जो कर्जदार आहे व ज्याचें कर्ज रु. १५,००० चे आंत आहे त्यांना या कायद्यामुळें आपलें कर्ज आपल्या ऐपतीप्रमाणें कमी करून मागतां यावें व त्याची फेड ठराविक लांब मुदतींच्या हप्त्यानें करतां यावी. या कायद्यान्वयें कर्जदार याची व्याख्या करण्यांत आली असून त्यांत शेतीविषयक कारणासाठी जो जमीन धारण करीत आहे अशी व्यक्ती ऋण विमोचन कायद्याप्रमाणें बोर्ड स्थापन झाल्या तारखेच्या लगतच्या पूर्वीच्या दोन वर्षांतील लागवडीच्या हंगामांत ज्या व्यक्तीनें स्वतः जमीन कसली आहे व ज्याचें शेतकी व शारीरिक मेहनतीखेरीजकरून इतर बाबींपासून वार्षिक उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ३३ टक्क्यांपेक्षा किंवा रु. ५०० या दोहोपैकीं जी रक्कम मोठी असेल त्या रकमेपेक्षा जास्त नाहीं अशी आहे. कर्ज या व्याख्येंत जें देणें मग तें देणें तारणावर असो अगर नसो व रोकडींत अगर इतर प्रकारांनीं देणें असेल तरीं तें देणें समजलें जाईल. यांत दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्याचा समावेश होईल, मात्र यांत शेतीविषयक धावयांच्या मजुरीच्या बाकीचा समावेश होणार नाहीं. त्याचप्रमाणें खालील देण्यास या कायद्याची अंमलबजावणी होणार नाहीं.

१. सरकारी कर्ज अगर देणें.
२. स्थानिक स्वराज्य संस्थेचें कर्ज अगर देणें.
३. सरकारी संस्थांचें देणें.
४. पिकांचेसाठी देण्यांत आलेलें कर्ज.
५. शेड्यूल्ड बँकेचें देणें.
६. कोर्टानें अन्नवस्त्रासाठी दिलेली रक्कम.

१ ऑगष्ट १९४७ पूर्वी अर्जदार अगर सावकार यांनीं ज्या भागांत त्यांचें साधारणतः वास्तव्य असेल अशा भागांतील कोर्टाकडे लेखी अर्ज करून अर्जासंबंधीं माहिती द्यावयाची आहे. अर्ज आल्यानंतर कोर्ट प्राथमिक चौकशी करून अर्जदार हा कायद्याचे कक्षेंत येतो किंवा नाहीं यासंबंधीं निर्णय देऊन पुढें अर्ज खात्याचे हिशोबाची छाननी करण्यास सुरुवात करील. सहकारी संस्था सरकार व शेड्यूल्ड बँका यांचे देणेबाबत अनुक्रमें सहकारी खात्याचे रजिस्ट्रार व जिल्हा बँक यांना नोटीस देऊन कर्जदाराचे घेण्यासंबंधीं तक्ता व जर कांहीं कर्जखातीं सूट देणें असेल तर त्याची रक्कम याची माहिती मागवील. वरील सर्व माहिती आल्यानंतर कोर्ट कर्जदाराची जिंदगी, त्याची किंमत, त्यावरील बोजे व कर्जदार याची फेडीची ऐपत यासंबंधीं विचार करील. फेडीची ऐपत जिंदगीच्या किंमत ६० टक्के इतकी धरली जाईल. जर सर्व कर्जे तारणाशिवाय असतील तर कर्जदाराचे फेडीच्या ऐपतीप्रमाणें

रक्कम कमी करण्यांत येईल. जर कर्ज तारणावरील असेल तर व कर्जाची रक्कम जर जिंदगीच्या ६० टक्क्यांपेक्षां जास्त असेल तर कर्जाची रक्कम फेडीच्या ऐपतीप्रमाणें कमी करण्यात येईल.

कोर्ट कर्जदाराचें कर्ज किती कमी करावयाचें याचा विचार करून निर्णय देईल व निर्णय देतांना तारण असलेल्या जिंदगीवर अशा कमी केलेल्या रकमेचा बोजा राहील व तारण नसलेल्या कर्जाचा बोजा इतर सर्व जिंदगीवर राहील. कर्जफेड करतांना खालीलप्रमाणें अग्र हक्क राहतील.

१. सरकारी देणें.
२. स्थानिक संस्थांचें देणें.
३. पीक तारणावरील कर्ज.
४. तारण कर्ज.
६. सरकारी, सहकारी सोसायट्यांसुद्धा कर्जें.
६. तारण नसलेलीं कर्जें.

कर्ज फेडीचे हप्ते वार्षिक राहतील व ते बारापेक्षां जास्त असणार नाहींत.

कर्जदाराचें एकंदर कमी केलेलें कर्ज जर त्याच्यां जिंदगीच्या किंमतीपेक्षां जास्त असेल तर कोर्ट सावकारांना आणखी किती सवलत देण्यास ते तयार आहेत याची विचारणा करील व असें कमी केलेलें कर्ज कर्जदार यानें एक महिन्याचे आंत दिलें नाहीं तर कोर्ट प्राथमिक लॅन्ड मार्गेज बँकेस कर्ज फेडण्यास हुकूम देईल.

जर कोर्टास चौकशी करून असें दिसलें कीं कर्जदार याची जिंदगी व त्याचें उत्पन्न हें कर्जफेडीस पुरेसें नाहीं तर कोर्ट त्यास नादार ठरवील व कर्जदार यास आवश्यक तेवढी जिंदगी ठेवून इतर जिंदगी विकण्याचा हुकूम काढील.

ज्या शेतकऱ्याचे कर्जासंबंधी काम कायद्याप्रमाणें कोर्टापुढें चालू आहे त्याला आपल्या जिंदगीचे तारणावर कर्ज काढतां येणार नाहीं व कोणासही त्यास कर्ज देता येणार नाहीं. यापुढें असें कर्ज पिकाचे तारणावर अधिकृत पतपेढ्या अगर सावकार यांजकडून काढावें लागेल व पीक तारण म्हणून द्यावें लागेल व तें सोसायटी सांगेल त्यास विकावें लागेल. पिक कर्जाची मर्यादा दरवर्षी त्या जिल्ह्याचे कलेक्टर ठरवितील.

हा कायदा करण्याचा उद्देश मुख्यतः शेतकरी लोकांना जें कर्ज आहे त्याचा बोजा कमी करून तें त्या कर्जदाराच्या परत फेडीच्या ऐपतीप्रमाणें कमी करावयाचें असून यापुढें मिळणारें कर्ज कमी व्याजानें, अल्प मुदतीसाठी व केवळ चालू शेतीसाठी जरूर त्या हंगामासाठी मिळावें व पुढें पुन्हा शेतकरी कर्जदार राहू नये असा आहे. नवीन कर्जही नियंत्रित सावकार अगर सहकारी संस्था अगर सहकारी मेन डेपो या मार्फत मिळणार असून कर्जदार यास त्याच्या कर्जाच्या खात्याच्या हिशेब पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. या कायद्याचा कर्जदार शेतकऱ्यांनीं सरकारी अपेक्षेप्रमाणें फायदा घेतल्यास योग्य असेंच होईल.

**हिंदुस्थान-सोव्हिएट रशिआंतील व्यापार**—सोव्हिएट रशिआंतून रासायनिक खतें मिळविण्याची व त्या राष्ट्राशीं व्यापार करण्याची शक्यता अजमावण्यासाठी एक हिंदी सरकारी प्रतिनिधी लवकरच मास्कोला जाणार आहे.

**हिंदी शास्त्रीय परिषद्**—पुढील वर्षी जानेवारी २ ते ८ पर्यंत भरणाऱ्या हिंदी शास्त्रीय परिषदेची तयारी पाटण्यास चालू आहे. परिषदेला १,००० प्रतिनिधी हजर रहातील असा अंदाज आहे. परिषदेचे अध्यक्ष सर आर. एन्. चोप्रा हे आहेत.




आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी
९६ नारायण पेठ, पुणें २.

# गोवर्धन डेअरी फार्म्स लि.

गोवर्धनवाडी, पुणें १

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ सरदार के. आर. त्रिचूरकर, बी. ए., एलएल. बी., जहागिरदार, पुणें ( चेअरमन )
२ सरदार व्ही. डी. पानसे, जहागिरदार, पुणें.
३ श्रीमंत जी. व्ही. साळवेकर, बी. ए., मुंबई.
४ श्री. एस. एस. निसळ, जहागिरदार व बँकर, अहमदनगर.
५ श्री. एस. जी. लोंबार, मर्चंट, पुणें.
६ सरदार अमरसिंहराव कदम, पुणें.
७ रावसाहेब वाय. डी. खोले, पुणें. ( स्पेशल डायरेक्टर )
८ श्री. व्ही. एस. सोलापूरकर, लँडलॉर्ड, पुणें. ( अधिकारपरत्वें )

—मॅनेजिंग एजंटस—

★ मेसर्स सोलापूरकर अँड डोणवाड. ★

## कंपनीचीं वैशिष्ट्यें

★ कंपनीनें आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री, ट्रॅक्टर वगैरे आणविली असून तिच्या सहाय्यानें शेतीचीं सर्व कामें करून घेणार आहेत.
★ कंपनीनें बाजारभाव सुमारें १ लक्ष रु. असलेली जमीन माफक किंमतीस मिळविली आहे.
★ कंपनीच्या डेअरीमध्यें फक्त गाई — सिंधी गाईच — आहेत.
★ पहिल्याच वर्षी कंपनीनें ६% व ३% डिव्हिडंड दिलें आहे.

**शेअर्स विक्रीस काढलेले आहेत.**

डिपॉझिट रकमा स्वीकारल्या जातात.

| व्याजाचे दर— | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|---|
| | ४% | ५% | ६% |

—अधिक माहितीसाठी चौकशी करावी—

मॅनेजिंग एजंटस

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

## दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, वेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

० गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिले.

० मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.

० बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## वि ज य टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.




## रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.

पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केंस उगवतात, शांत झोंप येते, दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकें-दुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. २-०-०

रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डर्स्ट रोड, मुंबई ४

## सरसकट उलाढालीवर विक्रीकर बसवा

### मराठा चेंबरचें मतप्रदर्शन

मुंबई सरकारानें नेमलेल्या विक्रीकर चौकशी समितीच्या दोन महत्त्वाच्या शिफारशींबाबत लोकमत अजमावणें इष्ट वाटल्यामुळे सरकारनें त्या अजून अमलांत आणल्या नाहींत त्या शिफारशी अशा :

( १ ) सध्यांच्या शेवटच्या विक्रीवर कर घेण्याच्या योजने- ऐवजी, वस्तूंची जेथें जेथें व ज्या ज्या वेळीं विक्री होते त्या त्या सर्व विक्रीवर म्हणजे सरसकट उलाढालीवर करआकारणी करावी.

( २ ) सध्यां मुंबई सरकारनें ज्या वस्तू विक्रीकर-माफ ठरविल्या आहेत त्यांपैकीं बऱ्याचशा कमी कराव्या.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें चेंबरचें वरील मत मुंबई सरकारला कळविलें आहे. शेवटच्या विक्रीवर कर घेण्याची योजना ही अग्राह्य वाटते व त्याऐवजीं पुढें दिलेली सरसकट उलाढालीवरील कर आकारण्याची योजना मुंबई सरकारनें अमलांत आणावी असें कार्यकारी मंडळाला वाटतें. विक्रीकर चौकशी समितीनें सुचविलेली योजना चेंबरला मान्य नाहीं.

### सरसकट उलाढालीवरील करयोजना

( १ ) नवीन सरसकट उलाढालीवरील करयोजनेप्रमाणें विक्री- कराच्या कक्षेंत सर्व वस्तूंची विक्री आणावी व अर्थातच करमुक्त वस्तु ठेवूं नयेत.

( २ ) ज्या ज्या ठिकाणीं व ज्या ज्या वेळीं वस्तूंची विक्री होते अशा सर्व विक्रीवर विक्रीकराची आकारणी करावी.

( ३ ) सदर योजनेप्रमाणें करमाफ वस्तूच नसल्यामुळें एकंदर करपात्र विक्री सध्यापेक्षा आठ-दहा पटीनें अधिक होईल. तेव्हां विक्रीवरील करआकारणीचा दर, दर शेंकडा २ आणे प्रमाणें असावा व सदर आकारणी वार्षिक असावी.

( ४ ) करपात्र विक्रीची किमान मर्यादा वार्षिक रु. १०,००० अशी निश्चित करावी.

( ५ ) प्रान्ताबाहेर पाठविल्या जाणाऱ्या मालावर कर आकारणी करूं नये.

आणि वरील पांचहि गोष्टी एकजिनसी मानल्या जाव्यात व तशी एकजिनसी योजनाच अमलांत आणावी, असा कार्यकारी मंडळाचा स्पष्ट आग्रह आहे.

वर सुचविलेली सरसकट उलाढालीवरील करयोजना अमान्य होऊन सध्याची योजना चालू राहणार असेल तरच करमाफ वस्तूंचा प्रश्न प्रस्तुत ठरतो. सध्यांची शेवटच्या विक्रीवर कर घेण्याची विद्यमान योजना चालू राहिली तरीहि त्यांतील करमाफ वस्तूंच्या यादींत गोरगरीबांच्या जीवनाला आवश्यक अशा, अनेक वस्तु ( उदा.—चहा, मसाल्याचे जिन्नस, यांत्रिक सहाय्यानें काढलेलीं तेलें वगैरे ) आज समाविष्ट नसल्यामुळें विद्यमान यादीच अपुरी आहे.

तेव्हां विद्यमान यादींतूनहि बऱ्याचशा वस्तू कमी करण्याबाबतची कर चौकशी समितीची सूचना चेंबरच्या कार्यकारी मंडळाला मूलतः नापसंत आहे व ती कमी करण्यास कार्यकारी मंडळाचा संपूर्ण विरोध आहे.

कार्यकारी मंडळानें चेंबरच्या व्यापारी सदस्यांकडून सर्वसामान्यपणें गोरगरीब प्रधानतः कोणत्या वस्तु खरेदी करतात, याची माहिती मागवूनच वरील मतप्रदर्शन केलें आहे.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांस लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल गिऱ्हाइकास देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.